रे.दि.मु.नं.११०/२०१२ मधील नि.८० वरील आदेश

(पांडुरंग विरुध्द प्रकाश)

**CNR NO. MHSN14000332-2012**

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज अबेटमेंटचा हुकूम रद्द होऊन वारस रेकॉर्डवर घेणेकरीता दाखल केलेला आहे. याकामी प्रतिवादी नं.१ यांना नोटिस लागलेली आहे व त्यांनी हजर होऊन दाव्यामध्ये त्यांची कैफियत दिलेली आहे. असे असताना याकामी प्रतिवादी नं.३ मयत असल्याचे स्पष्ट झालेले आहे. वास्तविक सदर प्रतिवादी नं.३ हे मयत असल्याचे बेलिफ रिपोर्टवरुन समजल्यानंतर वादी यांनी त्यांच्या वारसांचे बाबत अनेक ठिकाणी चौकशी केली परंतु कोठेही त्यांचा शोधा लागत नव्हता. फेरफार नं.१४७६९ काढला व त्यामध्ये सदर प्रतिवादी नं.३ याच्या मृत्यूची तारिख व वारसांची नावे उपलब्ध झाली. सदर माहिती वादी यांना मिळण्यास बराच उशिर झाला त्यामुळे वारस रेकॉर्डवर घेणेस उशिरा झाल्याचे म्हटले आहे.

२. प्रतिवादी याने प्रस्तुत अर्जावरच त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार दावा निरंतर मनाईचा असल्याने प्रस्तुतचा अर्ज सर्वस्वी चुकीचा व बेकायदेशीर आहे. तसेच अर्जाचे कारण हे चुकीचे असल्याचे म्हटले आहे. तसेच अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास योग्य त्या कॉस्ट वरती मंजूर करणेस हरकत नाही असे म्हटले आहे.

३. दिवाणी प्रकिया संहिता आदेश २२ नियम ४ अन्वये एखादा प्रतिवादी मयत झाल्यास त्याच्या उत्तराधिकारी वारसांना रेकॉर्डवर घेण्याची तरतूद आहे. प्रस्तुत दावा मिळकतीचे कोणतेही व कसलेही तबदिलीचे व्यवहार करु नये व दावा मिळकतीमधून हुसकावून लावू नये अशी निरंतर ताकीद देण्याबाबत दाखल केलेला असल्याने प्रतिवादी नं.३ च्या वारसांना रेकॉर्डवर घेता येईल. प्रतिवादी नं.३ हा मयत झाला असला तरी वादी व प्रतिवादी याचे दावा मिळकतीसंबंधाने हक्क जिवंत असल्याचे दिसून येते. त्यामुळे वादीने दिलेल्या अर्जाप्रमाणे प्रतिवादी नं.३ यांच्या कायदेशीर वारसांना दाव्यात समाविष्ट करुन घेणे योग्य राहिल. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी नं.३ मयत झाल्यानंतर दावा अबेट झालेला रद्द करण्यात येतो.

३. या अर्जाचा खर्च म्हणून वादीने प्रतिवादीस र.रु.१००/- दयावेत.

सही/-

(एच. एस. सातपुते)

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिराळा

शिराळा

दि. १९/०६/२०१९